# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.२/२०२६** **दिनांक ०७/०४/२०२६**
**स्थळ-जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर** **वेळ- सायं. ०४.०० वा.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.०७.०४.२०२६ रोजी सायं.०४.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/वशी-०४/११९/२०२६ दि.०६.०४.२०२६ रोजीचे पत्रान्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.**

**त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.०७.०४.२०२६ रोजी सायं.०४.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे मा.श्री. शिवाजी कचरे, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.**

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्री. शिवाजी कचरे,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.डॉ.पंकज आशिया, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

**विषय नं.१ दि.२३.०३.२०२६ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१०६ दि.२३.०३.२०२६ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.२ नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा सन-२०२७ निमित्ताने संस्थानतर्फे शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी करावयाच्या पार्कींग, तात्पुरती निवासव्यवस्था इ.अनुषंगीक सुविधा पुरविणेकामी येणा-या रक्कम रु.२०.३४ कोटी मात्र इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास तसेच सदर कामासाठी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१०७ प्रस्ताव मंजुर. मा.उच्च न्यायालयात सी. ए. दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.३ नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा सन-२०२७ कालावधीत भाविकांचे सुविधेकरीता वाहतुक व्यवस्थेसाठी संस्थानतर्फे नगर-मनमाड रोड (हॉटेल सनराज जवळ) ते शिर्डी बायपास रोड (संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.२४५ मधील प्रस्तावीत पार्कींग) पर्यंतचा नाला क्र.३२ लगतचा रस्ता रुंदीकरण करुन विकसीत करणेसाठी येणा-या रक्कम रु.८.७५ कोटी मात्र इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास तसेच सदर कामासाठी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१०८ प्रस्ताव मंजुर. मा.उच्च न्यायालयात सी. ए. दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.४ नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा सन-२०२७ कालावधीत भाविकांचे सुविधेकरीता वाहतुक व्यवस्थेसाठी संस्थानतर्फे नाला क्र.३२ लगतचा रस्ता ते कनकुरी रोड पर्यंतचा रस्ता (संस्थानचे नवीन शैक्षणिक संकुल व वृध्दाश्रम समोरुन जाणारा रस्ता) रुंदीकरण करुन विकसीत करणेसाठी येणा-या रक्कम रु.४.७५ कोटी मात्र इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास तसेच सदर कामासाठी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१०९ प्रस्ताव मंजुर. मा.उच्च न्यायालयात सी. ए. दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.५** **सर्व्हे नं.१२४/१२५ मध्ये संस्थानचे सध्याचे पार्किंगलगत मल्टीलेव्हल पार्कींगसाठी इमारत बांधणेबाबत.**

**निर्णय क्र.११० प्रस्ताव नामंजुर.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.६** **श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारत बांधकामाचे ठेकेदार श्रीम भानु कन्स्ट्रक्शन प्रा.लि. मुंबई यांनी केलेल्या वाढीव रक्कम रु.११३,३४,७३,६६८/-मात्रचे क्लेम विषयी व सदर ठेकेदार यांनी संस्थानला दिलेल्या Arbitration (लवाद) चे नोटीस बाबत तसेच त्याचे अनुषंगाने संस्थानमार्फत Arbitrator यांचे नाव कळविणे व Advocate यांची नियुक्ती करणेबाबत.**

**निर्णय क्र.१११ प्रस्तावातील मुद्दा क्र. १ व ३ मंजुर. मुद्दा क्र.२ तहकुब.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.७** **श्रींचे दर्शनासाठी शिर्डी येथे येणा-या साईभक्तांचे वास्तव्य अधिक सोयीचे होऊन येथे भक्तांचा ओघ वाढावा यासाठी आध्यात्मिक कॉरीडोर विकसीत करणे, रस्ते विकसीत करणे व सुशोभीकरण कामांचा सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा देणेकामी सल्लागार यांची नियुक्ती करणेसाठी e-RFP प्रस्ताव मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.११२ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.८** **श्री.काशिनाथ गोविंद पाटील, कोपरी, विरार (पुर्व) यांचेकडून संस्थानला मौजे निघोज येथील साई पालखी निवारा मध्ये देणगी मिळालेल्या बी व डी इमारतींमध्ये अभ्यासिका सुरु करणेसाठी आवश्यक अंतर्गत इंटेरिअर व फर्निचरची कामे करणेसाठी आर्किटेक्ट नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.११३ प्रस्ताव तहकुब.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.९ संस्थानचे शिर्डी सर्व्हे नं.५४,५५ या वाहनतळावर साई भक्तांचे सुविधेकरीता नवीन टॉयलेट ब्लॉकचे बांधकाम करणेसाठी प्राप्त ई-निविदांपैकी निम्नतम निविदाधारक संकेत लक्ष्मण वाणी, कोपरगाव, अहिल्यानगर यांची रु.१९,९७,७१३/-मात्रची ई-निविदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.११४ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१० नवीन दर्शन हॉल इमारतीमधील ए.सी.प्लान्ट यंत्रणा दुरुस्ती कामी येणा-या खर्चास व कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.११५ प्रस्ताव मंजुर. चर्चा वाटाघाटी करुन कार्यादेश देण्यात यावा.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.११ श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाचे खोल्यामधील कॉट्स दुरुस्ती करुन त्यास कलर करणेकामी निम्नतम दरधारक मे.आसाई वॉशटेक प्रा.लि.नाशिक यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.११६ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१२ मंदिर व मंदिर परिसरातील जुन्या सीसीटीव्ही यंत्रणेचे अद्ययावतीकरण करणेबाबत.**

**निर्णय क्र.११७ प्रस्ताव तहकुब.**

**(कार्यवाही-सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)**

---

**विषय नं.१३ श्री साईबाबा नवीन दर्शन कॉम्पलेक्स मधील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग व गार्डनिंगची कामे आऊटसोर्स पध्दतीने करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबवून नवीन कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक होईपावेतो आहे त्याच ठेकेदारास मागील वर्षाचे दरात मुदतवाढ कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.११८ मुदतवाढ तीन महिने कालावधीकरीता देण्यात यावी.**

**(कार्यवाही-आरोग्य विभाग)**

---

**विषय नं.१४** **शिर्डी नगरपरिषद हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता विषयक कामांचा तिमाही परीक्षण अहवाल नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.११९** **नोंद घेतली.**

**(कार्यवाही- आरोग्य विभाग)**

---------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१५** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लागणारे वार्षिक औषधे, सर्जिकल साहित्य तसेच On Consignment Basis वरील साहित्य इ. खरेदीकामी दर निश्चिती (Rate Contract) करणेस व याकामी येणा-या अंदाजित रक्कम रु.३८,४८,९१,९४७/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१२०** **प्रस्ताव मंजुर. मा.उच्च न्यायालयात सी. ए. दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)**

---------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१६** **श्री साईबाबा रुग्णालयाकरीता Ventilator खरेदीकामीचा प्रस्ताव रद्द करुन निविदाधारकांची अनामत रक्कम परत करणेबाबत.**

**निर्णय क्र.१२१** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१७** **औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीचे बजेट वाढवून मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१२२** **माहे मार्च-२०२६ पर्यंत जो प्रत्यक्ष खर्च झालेला आहे त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१८** **तज्ञ डॉक्टरांनी त्यांचे तज्ञ ओपीडीचे दिवशी सर्जरी व प्रोसिजर केल्याने त्यावरील प्रलंबित ठेवलेला इंन्सेटीव्ह माहे जानेवारी व नोव्हेंबर २०२५ या कालावधीतील रु.८६,३६,३८६/- संबधित डॉक्टरांना अदा करणेबाबत.**

**निर्णय क्र.१२३** **प्रस्ताव तहकुब.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१९** **संस्थान रुग्णालयात पदव्युत्तर (PG) विद्यार्थ्यांची प्रशिक्षणार्थी म्हणून नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.१२४** **प्रस्ताव नामंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२०** **विश्वराज हॉस्पिटल, पुणे यांचेसमवेत MEMORANDUM OF UNDERSTANDING (MoU) करणेबाबत.**

**निर्णय क्र.१२५** **११ महिने कालावधीसाठी MoU करण्यात यावा. त्यानंतर त्यांचे कामकाजाचा आढावा घेऊन मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२१** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकीय संचालक व वैद्यकीय अधिकारी यांना तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी दिलेल्या नेमणुकांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर टप्प्याटप्प्याने पुन्हा नेमणूका देणेबाबत.**

**निर्णय क्र.१२६** **वैद्यकीय अधिकारी यांचा मुदतवाढीचा प्रस्ताव मंजुर. वैद्यकीय संचालक यांचे विरुध्द ज्या तक्रारी आल्या आहेत त्या संदर्भाने केलेल्या कार्यवाहीसह फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२२** **साईनाथ रुग्णालयामध्ये नव्याने आयुर्वेदिक आयपीडी विभाग सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.१२७** **प्रस्ताव तहकुब.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.२३** **श्री साईनाथ रुग्णालयातील फिजिओथेरपी विभागातील मशिनरीच्या वापराबाबतचे तसेच ESWL या किडनी स्टोन शस्त्रक्रिया यांचे दर निश्चीतीबाबत.**

**निर्णय क्र.१२८** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.२४** **श्री साईनाथ रुग्णालयातील रुग्णांच्या वैद्यकीय बिलात सवलत देणेकामी रकमेचे बजेट वाढवुन मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१२९** **माहे मार्च-२०२६ पर्यंत जो प्रत्यक्ष खर्च झालेला आहे त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.२५** **श्री साईनाथ रुग्णालय विभागातील डॉ.योगेश बाळकृष्ण गेठे, कान, नाक, घसा सर्जन यांचे माहे सप्टेंबर-२०२३ व ऑक्टोंबर-२०२३ चे वेतनातून कपात केलेली रक्कम अदा करणेबाबत.**

**निर्णय क्र.१३० प्रस्ताव तहकुब.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.२६** **महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत उपचार घेतलेल्या रुग्णांच्या रिजेक्ट फाईलच्या सवलतीबाबत.**

**निर्णय क्र.१३१** **प्रस्ताव मंजुर. समितीकडून ज्या केसेस नामंजुर होतात त्याच्या विरुध्द केस तपासणी करुन अपील करावे.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.२७** **आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये केलेल्या गुंतवणूकीच्या अहवालास व आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये कमाल व्याजदर देणा-या राष्ट्रीयीकृत बॅंकामध्ये मुदतठेवीच्या स्वरुपात गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१३२** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.२८** **जिल्हा परिषद, अहिल्यानगर येथे शालेय बांधकाम व नवीन शौचालय बांधकाम करणेकामी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकडून निधी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१३३** **संस्थानचे धोरणाअभावी अर्ज दप्तरी दाखल करण्यात यावेत.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.२९** **संस्थानचे टिडीएस (TDS) व जीएसटी कामकाजाबाबत.**

**निर्णय क्र.१३४ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.३०** **संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या संस्थान कायम व संस्थान कंत्राटी (५९८) कर्मचा-यांच्या वारसांना ठेकेदारामार्फत आऊटसोर्स ऐवजी इनसोर्स कंत्राटी कर्मचारी म्हणून कामावर सामावून घेणेबाबत.**

**निर्णय क्र.१३५ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३१** **अनुकंपा तत्वावर परिचारिका (Staff Nurse) पदावर (गट-'क') नेमणूक मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१३६ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३२** **श्री.भगवान दातार, कार्यकारी संपादक "साईलिला" यांना पुढील ११ महिने कालावधीसाठी देणेत आलेल्या मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.१३७ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३३** **मा.औद्योगिक न्यायालय, अहिल्यानगर येथे दाखल ULP No.102 ते UPL No.111/2020 मध्ये न्यायालयाने दि.०७.०२.२०२६ रोजी पारित केलेल्या आदेशाबाबत.**

**निर्णय क्र.१३८ प्रस्ताव मंजुर.** **(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३४** **श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात NEET व JEE प्रवेश परीक्षेचे वर्ग सुरु करण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया सुरु करण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१३९ प्रस्ताव मंजुर.** **(कार्यवाही-श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय)**

---

**विषय नं.३५** **श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा गणवेश प्रकार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून बदलणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१४०** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय)**

---

**विषय नं.३६** **संस्थानचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२५ पै.मध्ये सुरु असलेले श्री साईनाथ माध्यमिक हायस्कुल संस्थानचे स.नं.१०९ मधील जुने कन्या विद्या मंदिर व इंग्लिश मिडीयम स्कुल या जागेत स्थलांतर करणेबाबतच्या निर्णयाबाबत.**

**निर्णय क्र.१४१** **प्रस्ताव तहकुब.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.**

आयत्या वेळेचा

**विषय नं.१** **संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणारे मुल्यवान खडे (Precious Stones) तसेच खडयांसहीत सोने-चांदी वस्तु अलंकाराचे मुल्यांकन करणेसाठी १) श्री.प्रदिपकुमार जे. जवेरी / श्री. नरेश एन.मेहता, मुंबई आणि ०२) मे.सोनी शिवलाल ब्रदर्स ज्वेलर्स, मुंबई या मुल्यांकनकारांची ५ वर्षासाठी नियुक्ती करणेबाबत.**

**निर्णय क्र.१४२** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२** **दि.०१.१२.२०२५ ते दि.३१.०३.२०२६ या कालावधीत आर्थिक अनुदान मागणी करीता प्राप्त झालेल्या अर्जांवर निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.१४३** **संस्थानचे धोरणाअभावी अर्ज दप्तरी दाखल करण्यात यावेत.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**वरील निर्णय क्र.१०६ ते १४३ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर सायं.५.३० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(डॉ. पंकज आशिया,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(शिवाजी कचरे)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**